" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार "
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

## विवेकानंद ज्युनिअर कॉलेज, कोल्हापूर

कोल्हापूर

# अ ह वा ल

## राष्ट्रीय सेवा योजना जाणीव जागृती कार्यक्रम

### उद्दिष्टे व महत्त्व

सोमवार दि.5 ऑगस्ट, 2024 रोजी सकाळी 11वाजता राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये प्रथम वर्षासाठी सहभाग घेण्यासाठी ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते त्यांच्या निवड प्रक्रिया वेळी आपण या योजनेमध्ये भाग का घेऊ इच्छिता ? एन एस एस विषयी आपल्या मनामध्ये काय भावना आहेत ? या उपक्रमामध्ये भाग घेऊन देशासाठी आपण काय करू शकता ? सामाजिक बांधिलकी म्हणजे काय ? या सर्व प्रश्नांची सहभागी होणाऱ्या स्वयंसेवकाला माहिती व्हावी यासाठी मुलाखती घेणे पूर्वी डॉ. अभिजीत पाटील व कार्यक्रम अधिकारी श्री एल एस नाकाडी तसेच राष्ट्रीय सेवा योजना सदस्य सौ.गवळी मॅडम, सौ. माने मॅडम यांच्या वतीने सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

मोबाईलच्या आहारी गेलेल्या आजच्या विद्यार्थ्याला श्रमसंस्कार, श्रमप्रतिष्ठा, समाजसेवा व सामाजिक बांधिलकी या गोष्टींमुळे माणसाच्या जीवनाचे सार्थक कसे होऊ शकते हे पटवून दिले. थोर समाजसेवक संतगाडगेबाबा, अण्णा हजारे यांना मिळणाऱ्या श्रम प्रतिष्ठानमुळे त्यांच्या जीवनाचे सार्थक कसे झाले ? त्यांचा आदर्श समोर ठेवून नवीन पिढीने पुढील वाटचाल केली पाहिजे. समाजसेवेचे धडे घेऊन आपण आपल्या देशाला महासत्ता बनवू शकतो. अशा प्रकारची विद्यार्थ्यांमध्ये जाणीव करून देण्यात आली व समाजसेवेविषयी जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. केवळ आनंद मिळतो म्हणून एन एस एस मध्ये सहभागी होऊ नका नशीबवान विद्यार्थ्याला राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये संधी मिळते असे समजून कार्यमग्न व्हा. मुलाखतीतून प्रथम वर्ष स्वयंसेवकांची योग्य पद्धतीने निवड करण्यात आली. यावेळी 60 ते 70 विद्यार्थी या योजनेमध्ये भाग घेण्यासाठी उपस्थित होते.

सदर निवड कार्यक्रमास मा. प्राचार्य डॉ.आर आर कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच यावेळी इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

श्री. एल. एस. नाकाडी
PROGRAMME OFFICER
N. S. S + 2
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR

डॉ. आर. आर. कुंभार
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

राष्ट्रीय सेवा योजना
जागृती कार्यक्रम

दि. 5.8.2024




